**कालमर्यादा**

क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४८३१/२०२०
कार्यालय - जिल्हा परिषद,नागपूर,
शिक्षण विभाग (प्राथमिक)
दिनांक :- ०४ ऑगस्ट, २०२०

प्रति,

गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती --------------(सर्व) जिल्हा- नागपूर

विषय :- बदलीस पात्र व बदली अधिकार प्राप्त प्राथमिक शिक्षकांच्या शाळानिहाय व संवर्गनिहाय (सर्वसाधारण व अवघड क्षेत्र) सुधारीत जेष्ठता यादया प्रसिध्दीबाबत.------ सर्वसाधारण बदल्या -२०२०

संदर्भ:- १) ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था -१४दि.२७ फेब्रुवारी,२०१७

२) ग्राम विकास विभागाचे शासन निर्णय क्र.जिपब-४६१७/प्र.क्र.५६७/आस्था -१४दि.१५ फेब्रुवारी,२०१८

३) ग्राम विकास विभागाचे शासन शुध्दीपत्रक क्र.जिपब-४८१७/प्र.क्र.७/आस्था –१४ दि.१५ एप्रील,२०१७ दि.१७ मे,२०१७, दि.३१ मे,२०१७

४) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/आस्था-३/प्र.क्र.१२-१७/३०९० दि.२९/०४/२०१७ ( अवघड क्षेत्राची घोषित यादी. ८६ गांवे)

५) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/आस्था-३/प्र.क्र.३५-१८/१५७० दि.०१/०३/२०१८ ( महिला शिक्षकांसाठी काम करण्यास प्रतिकुल अवघड क्षेत्राची घोषित यादी. ४९ गांवे)

६) ग्राम विकास विभागाचे शासन पूरकपत्र क्र.जिपब-४८१९/प्र.क्र.३७३/आस्था –१४ दि.२८ मे, २०१९

७) कक्ष अधिकारी,ग्राम विकास विभाग,मुंबई यांचे पत्र क्र. संकीर्ण २०२०/प्र.क्र.२८२/आस्था-१४ दि.१५ जुलै, २०२०

८) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४३३०/२०२० दि.१६.०७.२०२०

९) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४३८१/२०२० दि.१७.०७.२०२०

१०) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४४१४/२०२० दि.२०.०७.२०२०

११) या कार्यालयाचे शु.पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४५११/२०२० दि.२४.०७.२०२०

१२) या कार्यालयाचे पत्र क्र.जिपना/शिविप्रा/स्था-३/प्र.क्र.२२-२०/४५४८/२०२० दि.२७.०७.२०२०

उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, संदर्भिय शासन निर्णये व शासन शुध्दीपत्रकान्वये जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्यांसाठी सुधारीत धोरण निश्चित केलेले आहे. संदर्भिय क्र.१ चे शासन निर्णयातील परिच्छेद II) ३. मधील तरतूदीनुसार संदर्भिय क्र.११ व १२ चे पत्रान्वये बदलीस पात्र प्राथमिक शिक्षकांच्या शाळानिहाय व संवर्गनिहाय (सर्वसाधारण व अवघड क्षेत्र) प्रारुप जेष्ठता यादया प्रसिध्द करण्यात आलेल्या होत्या. प्रारुप यादयांवर प्राप्त आक्षेपानुसार शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांचे स्तरावर दुरुस्ती करण्यात आलेली असून दुरुस्तीनंतर खालील नमुद केल्याप्रमाणे सुधारीत यादया प्रसिध्द करण्यात येत आहे.

| **संवर्गाचे नांव** | **सर्वसाधारण क्षेत्र** | **अवघड क्षेत्र** |
|---|---|---|
| १) सहाय्यक शिक्षक (इयत्ता १ ली ते ५ वी) | अ.क्र. ०१ ते ९७४ | अ.क्र.०१ ते ४० |
| २) विज्ञान विषय संवर्ग | अ.क्र. ०१ ते १७५ | अ.क्र. ०१ |
| ३) भाषा विषय संवर्ग | अ.क्र. ०१ ते १७६ | अ.क्र. ०१ ते ११ |
| ४) सामाजिक शास्त्र विषय संवर्ग | अ.क्र. ०१ ते २२ | अ.क्र. निरंक |
| ५) उच्च श्रेणी मुख्याध्यापक | अ.क्र. ०१ ते ०७ | अ.क्र.निरंक |

**संदर्भिय क्र. ११ व १२ चे पत्रान्वये प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप यादयांवरील दुरुस्तीसाठी केलेल्या** अर्जानुसार ज्या शिक्षकांचे समाधान झाले नसल्यास त्यांनी सदर शासन निर्णयातील तरतूदी प्रमाणे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,नागपूर यांचेकडे अपील अर्ज सदर पत्र निर्गमित चे दिनांकापासून पाच दिवसाचे आत सादर करावे.



Scanned with CamScanner

शिक्षकांनी त्यांचे अपील अर्ज शिक्षण विभाग (प्राथमिक) या कार्यालयातील टपाल विभागात सादर करावे. **अपील अर्जासोबत या अगोदर प्रारुप यादीवरील दुरुस्ती सुचविलेल्या अर्जाची प्रत,सबळ पुरावे व बदली यादीचे विवरणपत्र अ मध्ये सविस्तर माहिती तसेच अपील अर्ज हा शासन निर्णयातील तरतूदीनुसार असणे आवश्यक आहे.**

अपील अर्ज शासन निर्णयातील तरतूदीनुसार नसल्यास किंवा विहित मुदतीनंतर प्राप्त अपील अर्जावर कुठलीही कार्यवाही केल्या जाणार नाही.

सर्वसाधारण क्षेत्राकरीता क्षेत्रनिहाय **सलग सेवा कालावधी हा १० वर्षाचा तसेच अवघड क्षेत्रासाठी ०३ वर्षाचा आहे** तसेच **सर्वसाधारण क्षेत्राकरीता विद्यमान शाळेतील सलग सेवा कालावधी ३ वर्षाचा आहे.**

बहुतेक शिक्षकांच्या सेवापुस्तिकेमध्ये शाळांचे स्थानांतरणाच्या नोंदी राहत नसल्यामुळे कार्यालयाला त्यांच्या पुर्वीच्या शाळांच्या क्षेत्राची (सर्वसाधारण/अवघड) माहिती घेणे शक्य होत नाही. त्यामुळे वर नमुद केल्याप्रमाणे जे शिक्षक बदली पात्र ठरत नसतांना सुध्दा त्यांची नावे सदर्हू सुधारीत बदलीपात्र यादीमध्ये आलेले असेल अशा शिक्षकांनी आपली नावे कमी करण्यास्तव लेखी अर्ज या कार्यालयास पाच दिवसाचे आत सादर करावे. अन्यथा चुकीची बदली झाल्यास त्यास सर्वस्वी संबधित शिक्षक जबाबदार राहील याची गांभीर्याने स्पष्ट नोंद घ्यावी.

गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती यांना कळविण्यात येते की, वस्ती शाळा निमशिक्षकांना दि.०१ मार्च,२०१४ पासून नियमित केलेले आहे. त्यामुळे अशा शिक्षकांचा पुर्वीचा कालावधी बदली प्रक्रियेमध्ये गृहीत धरु नये.

तसेच आंतरजिल्हा बदलीने व खाजगी अनुदानित शाळेतील रुजु झालेल्या शिक्षकांच्या बाबतीत जिल्हा परिषद,नागपूर अंतर्गतचा सेवा कालावधी बदली प्रक्रीयेकरीता गृहीत धरावा. त्यानुसार सदर यादयांमध्ये दुरुस्तीची कार्यवाही करावी.

सदर्हू यादया जिल्हा परिषद, नागपूरचे www.nagpurzp.com या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत. याची संबंधीत यंत्रणेनी व शिक्षकांनी नोंद घ्यावी.

सबब, माहितीस तथा आवश्यक उचित कार्यवाहीस्तव अग्रेषित.

सहपत्र:- वरील प्रमाणे संवर्ग निहाय जेष्ठता यादया.

**( चिंतामण वंजारी )**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर**

<u>**प्रतिलीपी:**</u>-मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**जिल्हा परिषद, नागपूर**

Scanned with CamScanner